# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा,ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१८/०२/२०२५

### जिल्हा : सोलापूर

### हवामान अंदाज :

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१८/०२/२०२५ ते २२/०२/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| पाऊस (ममी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कमाल तापमान (अं.से.) | 37 | 37 | 36 | 36 | 36 |
| कमान तापमान (अं.से.) | 14 | 15 | 15 | 14 | 14 |
| ढग स्थिती (आकाश) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 65 | 64 | 59 | 57 | 56 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 31 | 31 | 26 | 26 | 24 |
| वाऱ्याचा वेग (कमी/तास) | 4 | 4 | 4 | 6 | 6 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 22 | 22 | 31 | 38 | 40 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृ ष वषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक १८ ते २२ फेब्रुवारी, २०२५ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| वस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | वस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र वभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, ना शक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक १६ ते २२ फेब्रुवारी, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • कोरडे हवामान राहण्याची शक्यता लक्षात घेता रब्बी पके, भाजीपाला व फळबागांना स्थानिक परिस्थिती, ज मनीची खोली/ ज मनीचा प्रकार व गरजेनुसार पाणी द्यावे.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पकाचे कीड व रोगासंदर्भात निय मत सर्वेक्षण करून जर प्रादुर्भाव आ र्थक नुकसान पातळीच्या वर असल्यास व वध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी मेघगर्जना व वजेचा पूर्वानुमाना करीता दा मनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी कृ ष वषयक माहितीसाठी महात्मा फुले कृ ष वद्यापीठाची कृ षद र्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| हरभरा | पक्वता ते काढणी अवस्था | हरभरा पीक ओलसर असताना काढणी करु नये. घाटे कडक वाळल्यानंतर मगच हरभऱ्याची काढणी करून मळणी करावी. यानंतर धान्यास ५-६ दिवस कडक ऊन द्यावे. हरभरा कोठीमध्ये साठवून ठेवावा. त्यामध्ये कडु लंबाचा पाला घालावा. त्यामुळे साठवणीत कीड लागत नाही. |

| | | |
|---|---|---|
| रब्बी ज्वारी | पक्वता ते काढणी | पक्व होत असलेल्या ज्वारी पकांचे पक्षांपासून संरक्षण करावे. कणसामध्ये दाणे भरण्याच्या अवस्थेत पकास पाणी मळाल्याने कणसात दाणे भरण्यास मदत होते. कणसाचे वजन वाढून उत्पादन वाढते. ज्यांच्याकडे संचनाची सु वधा उपलब्ध असेल त्यांनी ज्वारीस पाणी द्यावे. रब्बी ज्वारीचे पक काढणी अवस्थेत आलेले असल्यास त्याची काढणी व मळणी करावी. तसेच मळणी झालेले धान्य उन्हात चांगले वाळवावेत (धान्यातील ओलावा १० % पेक्षा कमी असावा) आ ण त्यामध्ये वाळलेला कडूनिंबाचा पाला मसळून साठवणूक करावी. साठवण कोंदट कवा ओलसर जागेत करू नये. |
| गहू | फुलोरा अवस्था | गहू पकाच्या ज्या महत्वा च्या अवस्था आहेत त्यावेळी पकास पाणी देणे फायदेशीर ठरते. गहू पकास पेरणीनंतर ६० ते ६५ दिवसांनी (पीक ओंबीवर येण्याची वेळ) पाणी द्यावे तसेच स्थानिक परिस्थिती व ज मनीच्या खोलीनुसार पाण्याच्या दोन पाळ्यामध्ये अवशक्तेनुसार अंतर ठेवावे. |
| मका | दाणे भरण्याची अवस्था | अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% कंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रम प्रती लटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. |
| कांदा | पक वाढीची अवस्था | कांदा पकावरील फुल कडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० **%** ई. सी. १५ मली कंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५**%** ई. सी. ६ मली या कटकनाशकांच्या प्रति १० लटर पाण्यात मसळून आलटून पालटून फवारण्या कराव्यात. |
| आंबा | मोहोर अवस्था | आंबा मोहरावरील तुडतुडयांच्या नियंत्रणासाठी मेटारायाझीयम अनिसोपली कंवा व्हरटीसेलीयम लेकॅनी १.१५ % डब्लू.पी. ५० ग्रॅम प्रती १० लटर पाण्यात कंवा इ मडयाक्लोप्रीड १७.८ एसएल ३ मली प्रति १० लटर पाण्यात मसळून फवारणी करावी. कृपया शेतकरी बांधवांनी शफारस केलेल्या मात्रेपेक्षा जास्त प्रमाणात कीटकनाशके वापरू नयेत व आलटून पालटून वेगवेगळी कीटकनाशके योग्य मात्रेत व योग्य अंतराने वापरावीत. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | उन्हाळी हंगामात जनावरांना हिरवा ओला चारा उपलब्ध व्हावा म्हणून पाणी उपलब्धतेनुसार ज्वारी कंवा बाजरी कंवा मका या चारा पकांची लागवड करावी. जंताच्या व व वध आजाराच्या नियंत्रणासाठी पशु वैद्यकाच्या सहाय्याने जंतनाशक व लसी जनावरांना पाजावे/टोचून घ्यावे. जनावरांचे गोठे उंच ठिकाणी व हवेशीर असावेत. जनावरांना व पक्ष्यांना नेहमी पण्यास स्वछ पाणी द्यावे. |

*टिप : शेतकरीबंधूनी पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता कसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान :-

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : १८.०२.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**